D/Hitendra/General 2023-2024

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रभाग कार्यालय क्र. ०५**

**आरक्षण क्र. १७८ समाज मंदिर,**

ए.पी.जी अब्दुल कलाम उद्यान बाजुला
हैदरी चौक, नया नगर, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे-४०११०७
दुरध्वनी क्र. २८१२३४०९, २८१३११०१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/प्र.का.मि-५/११३२ /२०२३-२४ दि :- ३०/१०/२०२३

प्रति,
मा. जनसंपर्क अधिकारी
जनसंपर्क विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- बेवारस व पडिक वाहनांची जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**
**संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.३५/नवि-२० मंत्रालय, दि. ०२/०३/२०२०**
**२) मा. उपायुक्त सो. (अतिक्रमण निर्मुलन) यांचेकडील जा.क्र.मनपा/अनि/४८४/२०२३-२४ दि.२०/१०/२०२३ प्राप्त दि.२३/१०/२०२३ रोजीचे पत्र.**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र.०५ कार्यक्षेत्रात आढळुन येणाऱ्या बेवारस व पडिक वाहनांना नोटिस बजावण्यात आली असुन सदरची वाहने विहित मुदतीत काढुन न घेतल्यास महानगरपालिकेमार्फत जप्त करण्यात येतील. याबाबतची जाहिरात राज्यस्तरीय व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- नोटिस बजावण्यात आलेल्या पडीक व बेवारस वाहनांची यादी.**

(स्वप्निल सावंत)
**सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी**
**प्रभाग क्र. ०५**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

प्रत माहितीस्तव :-
१) मा. उपायुक्त सो. (अतिक्रमण निर्मुलन)
२)मा. विभाग प्रमुख सो.
अतिक्रमण व अन. बांधकाम विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रभाग कार्यालय क्र. ०५**

**आरक्षण क्र. १७८ समाज मंदिर,**

ए.पी.जी अब्दुल कलाम उद्यान बाजुला

हैदरी चौक, नया नगर, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे-४०११०७

दुरध्वनी क्र. २८१२३४०९, २८१३११०१


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मिरा भाईंदर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र.05 कार्यक्षेत्रातील बेवारस / पडीक अवस्थेत वाहने आढळुन आली असुन सदर पडीक अवस्थेत ठेवलेल्या वाहनांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे व सदर जागेवर साफसफाई करण्यास अडथळा निर्माण होत असल्यामुळे त्या ठिकाणी घाण / कचरा साठून राहत आहे. तसेच सदर पडिक वाहनामुळे काही कारणास्तव आग लागुन अपघात देखील होण्याची शक्यता नाकारत येत नाही. तरी सदर सोबत जोडलेले यादीतील वाहनांना दि.27/10/2023 रोजी नोटिस बजावण्यात आली असुन सदरची वाहन **48 तासांच्या** आत हलविण्यात यावे, तसे न केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 230 व 231 अन्वये प्राप्त अधिकारान्वये सदरचे वाहन दि.02/11/2023 रोजी महानगरपालिकेमार्फत कर्षण करण्यात येईल व सदर कर्षणासाठी येणारा सर्व प्रशासकीय खर्च वाहन मालकाकडुन वसुल करण्यात येईल. तसेच दंड भरून न सोडविलेल्या वाहनांचा कर्षणाच्या दिवसापासुन **03 महिन्यानंतर** सदर वाहनांचा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार ई-लिलाव करून लिलावित वाहनांची प्रादेशिक परिवहन कार्यालयातील नोंदणी रद्द करणेची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**प्रभाग क्र.05 कार्यक्षेत्रातील रस्त्यावरील उचलण्यात येणाऱ्या बेवारस / पडिक वाहनांची यादी - सन 2023-24**

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहन प्रकार | वाहन कंपनी | अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहन प्रकार | वाहन कंपनी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 01. | MH-04 BS-0898 | चारचाकी | सॅन्ट्रो (हुंडाई) | 02. | MH-04 CM-9452 | चारचाकी | स्कॉरपीओ (महिंद्रा) |
| 03. | MH-04 HY-4806 | चारचाकी | डॅस्टर (निसान) | 04. | MH-04 CW-1335 | तीनचाकी | ऑटो रिक्षा |
| 05. | MH-04 CW-3165 | तीनचाकी | ऑटो रिक्षा | 06. | MH-09 BM-7224 | चारचाकी | इको (मारूती सुझुकी) |
| 07. | MH-48 S-9322 | चारचाकी | इनोवा (तवेरा) | 08. | MH-04 CW-5315 | तीनचाकी | ऑटो रिक्षा |

(स्वप्निल सावंत)
सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी
प्रभाग क्र. ०५
मिरा भाईंदर महानगरपालिका